लक्ष्मी लॉन्स मंगल कार्यालय
फक्त ५१०००/- रु.
जेवणासह (अटी लागू)
• निसर्गरम्य हवेशिर वातावरण • पाण्याची भरपूर सोय • जेवणासाठी स्वतंत्र हॉल • वधू-वरांना स्वतंत्र रूम्सची सोय • २४ तास लाईटची सोय
श्री स्वामी समर्थ सेवा आश्रम ट्रस्ट
अक्कलकोट-सोलापूर एन.एच.रोड, अक्कलकोट
मो. ९३२६१५८१५१ / ८६२५००५१११



दैनिक सोलापूर

असत्याच्या दुनियेतील सत्य शोधणारे सायं दैनिक

# कटूसत्य

किंमत ५ रुपये

Email - katusatya@gmail.com



विकणे आहे
मौजे नान्नज व अकोलेकाटी ता उत्तर सोलापूर येथील बागायत शेतजमीन सर्व सोयीनियुक्त विकणे आहे शेतामध्ये ५ बोअरवेल, शेततळे, मोटारपंप, सालगडी राहणेसाठी वस्ती, आमराई, ७० फूट खोल विहीर, ड्रीप पाईप लाईन, स्प्रिंकलर, द्राक्ष फाउंडेशनसह विकणे आहे
संपर्क: मनोरमा मल्टीस्टेट नान्नज शाखा
श्री पवार- 8600568860, 9763663792, 9545386261



सोलापूर | RNI No . MAHMAR 2006/17624 | वर्ष १९ वे, अंक २२ वा | मंगळवार, दि. ०६ ऑगस्ट २०२४ | पाने ४ | पोष्ट परवानाः - SLP/04/2023-2025 Posted at - R.M.S.Post Office SOLAPUR



कामिनी गांधी
संस्था, फॅशन डिझायनिंग
सरकारमान्य सर्टिफिकेट
गारमेंट मॅन्यु. ॲंड फॅशन डिझायनिंग - फर्स्ट ईयर
फॅशन डिझायनिंग ॲंड फॅशन टेक्नॉलॉजी - सेकंड ईअर
कॉम्प्युटराईज्ड फॅशन डिझायनिंग ॲण्ड टेक्नॉलॉजी - थर्ड ईअर
▸ फॅशन ड्रेस डिझायनिंग ▸फॅशन ब्लाऊज डिझायनिंग ▸प्रिंसेस ब्लाऊज ▸अरी वर्क ▸पार्टीवेअर गाऊन
एका वर्षात कुटुंबातील कमवता सदस्य व्हा.
या... पहा.. शिका..!
३६३, दक्षिण कसबा, युनिक हॉस्पिटल समोर, जुनी फौजदार चावडी, सोलापूर
9850117867, 9096495025


# राज ठाकरेंचा निषेध करण्यासाठी मराठा आंदोलक हॉटेलमध्ये घुसले

**धाराशिव (कटूसत्य वृत्त):-** धाराशिवमध्ये मराठा आंदोलकांनी राडा घातला. मनसे अध्यक्ष राज ठाकरे धाराशिव दौऱ्यावर आहेत. ज्या हॉटेलमध्ये राज ठाकरे थांबले होते, त्या हॉटेलमध्ये मराठा आंदोलकांनी राडा घातला.

मराठा आंदोलकांनी राज ठाकरे यांची भेट मागितली होती. मराठा आरक्षणावर त्यांना राज ठाकरे यांच्याशी चर्चा करायची होती. पण राज ठाकरे यांनी भेट नाकराल्याने मराठा आंदोलक आक्रमक झाले. जोपर्यंत राज ठाकरे मराठा आरक्षणावर आपली भूमिका मांडत नाहीत तोपर्यंत माघार घेणार नाही अशी भूमिका मराठा आंदोलकांनी घेतली होती.



मनसे अध्यक्ष राज ठाकरे सोलापूर, धाराशिवच्या दौऱ्यावर आहेत. दौऱ्याचा आजता त्यांचा दुसरा दिवस आहेय. आपल्या दौऱ्यात राज ठाकरे यांनी मनसे कार्यकर्त्यांशी संवाद साधला. 11 विधानसभा मतदारसंघांचा ते आढावा घेणार आहेत. यावेळी राज ठाकरे यांनी आरक्षणाव वक्तव्य केलं. या वक्तव्यावरुन मराठा समाज आक्रमक झाला आहे. धाराशिव जिल्ह्यात राज ठाकरे पुष्पक हॉटेलमध्ये मुक्कामी आहेत. यावेळी मराठा आरक्षणावर चर्चा करण्यासाठी काही मराठा आंदोलक पुष्पक हॉटेलमध्ये आले. पण राज ठाकरे यांनी भेटण्यासाठी नकार दिला. त्यामुळे मराठा आंदोलक आक्रमक झाले आणि त्यांनी हॉटेलमध्येच घोषणाबाजी सुरु केली.

### राज ठाकरे काय म्हणाले होते

मराठा-ओबीसी आरक्षणावरून राज ठाकरेंनी भाष्य केलंय. माथी भडकवून मतं हातात घेण्याचा उद्योग आहे. कुणाच्यातरी खांद्यावर बंदूक ठेवून मतांचं राजकारण सुरू असून, अशा व्यक्तींना निवडणुकीवेळी दूर ठेवा असं राज ठाकरेंनी म्हटलंय. "बाहेरच्या राज्यांमधून मुलं येतात आणि आपल्या राज्यातील नोकऱ्या बळकावतात. आपल्या राज्यातील शिक्षण संस्थांमध्ये शिक्षण घेतात. आपल्या मुला मुलींना मिळत नाही. ठाणे, पुणे, नागपुरात ज्याप्रकारचे फ्लायओव्हर्स, ब्रीज आणि इतर सगळ्या गोष्टी मूळच्या लोकसंख्येसाठी नाही तर बाहेरुन येणाऱ्या लोकांसाठी होतात. म्हणजे बाहेरुन येणाऱ्या लोकांचा लोंढा किती मोठ्या प्रमाणात आहे. येथे या शहरात आल्यानंतर त्यांची व्यवस्था करण्यात सरकारचा इतका पैसा खर्च होतो. राज्यात इतक्या गोष्टी उपलब्ध असताना महाराष्ट्राला आरक्षणाची गरजच नाही. महाराष्ट्रातील मुला मुलींना आधी प्राधान्य द्या आणि उरल्या तर बाहेरच्यांना बोलवा असं मी आधीपासूनच सांगत आहे' असं राज ठाकरे म्हणाले आहेत.

### राज ठाकरे यांच्या अटकेची मागणी

राज ठाकरेंवर टाडा लावून अटक करा, राज ठाकरेंची वक्तव्य ही समाज दुभंगण्याची आहेत. समाज दुभंगला की देश दुभंगतो. असं म्हणत वंचितचे अध्यक्ष प्रकाश आंबेडकर यांनी राज ठाकरेंवर निशाणा साधलाय... महाराष्ट्राला आरक्षणाची गरज नाही...बाहेरून येणाऱ्यांमुळे लोकसंख्या वाढतेय... आणि यामुळे बाहेरून येणा-यांवर शासनाचा सर्वाधिक पैसा खर्च होतोय असं विधान राज ठाकरेंनी केलं होतं...यामुळे राज ठाकरेंना टाडा लावून अटक करा अशी मागणी आंबेडकरांनी केलीय...

# उजनी धरणातून 1 लाख 25 हजार तर वीरमधून 33 हजार 609 क्युसेकचा विसर्ग

## नदीकाठच्या नागरिकांनी सतर्कता बाळगावी



**पंढरपूर (कटूसत्य वृत्त):-** उजनी धरण व वीर पाणलोट क्षेत्रात सतत सुरु असलेल्या पावसामूळे धरणे शंभर टक्के भरली आहेत. त्यामुळे धरणांमधून मोठ्या प्रमाणात विसर्ग सुरु आहे. उजनी धरणातून सायं.5.00 वाजता 1 लाख 25 हजार क्युसेकचा तर वीरधरणातून 33 हजार 609 क्युसेकचा विसर्ग सुरु आहे. संगम येथून दुपारी 3.00 वाजेपर्यंत 1 लाख 37 हजार 860 क्युसेक पाणी भीमा नदीत मिसळत असल्याने भीमा नदी पात्राच्या पाणी पातळीत वाढ होत आहे. भीमा नदी पात्रातील वाढती पाणी पातळी लक्षात घेता नदीकाठच्या नागरिकांनी सतर्कता बाळगावी असे आवाहन प्रांताधिकारी सचिन इथापे यांनी केले आहे.

मागील काही दिवसांपासून उजनी व वीर धरण क्षेत्र परिसरात सततच्या पावसामुळे मोठ्या प्रमाणात विसर्ग सुरु आहे. नदी पात्रातील पाणी पातळीत वाढ झाल्याने दगडी पूल तसेच नदीवरील पिराची कुरोली, गुरसाळे, पंढरपूर, गोपाळपूर, मुंढेवाडी, पूळूज हे 6 बंधारे पाण्याखाली गेले आहेत. चंद्रभागा नदी पात्रात सध्या 59 हजार 222 क्युसेक पाणी वहात आहे. संगम येथून येणाऱ्या पाण्यामुळे चंद्रभागा नदी पात्रात रात्री 8.00 वाजले नंतर सुमारे 1 लाख 37 हजार क्युसेकने पाणी वाहणार आहे.

भीमा नदीवरील पंढरपूर तालूक्यातील पिराची कुरोली, गुरसाळे, पंढरपूर, गोपाळपूर, मुंढेवाडी, पूळूज हे कोल्हापूर पध्दतीचे बंधारे पाण्याखाली गेल्याने बंधाऱ्यावरुन होणारी वाहतूक बंद राहणार आहे. चंद्रभागा दुथडी भरून वाहत आहे. त्यामुळे नदीकाठच्या गावातील नागरिकांना सतर्कता बाळगावी. नदीपात्रात कोणीही उतरु नये. स्थानिक ग्रामपंचायतीचे ग्रामसेवक, तलाठी, मंडलअधिकारी, पोलीस पाटील पुरस्थितीवर नियंत्रण ठेवून आहेत. नागरिकांनी काळजी घ्यावी. प्रशासनास सहकार्य करावे. असे आवाहनही उपविभागीय अधिकारी सचिन इथापे यांनी केले आहे.

भीमा नदीपात्रात 1 लाख 30 हजार क्युसेक विसर्ग आल्यावर (443.600 पाणी पातळी मीटर) नदीकाठी असणाऱ्या व्यास नारायण झोपडपट्टीमध्ये पाणी शिरते. 1 लाख 60 हजार क्युसेक विसर्ग आल्यावर (444.500 पाणी पातळी मीटर) गोपाळपूर येथील नवीन पुलावर पाणी येते. तर 2 लाख क्युसेक विसर्ग आल्यावर (445.500 पाणी पातळी मीटर) संतपेठ झोपडपट्टीतील सखल भागात पाणी येते. तर 2 लाख 25 हजार क्युसेक विसर्ग आल्यावर (446.300 पाणी पातळी मीटर) गोविंदपुरा येथे पाणी येते. 3 क्युसेक विसर्ग आल्यावर (447.850 पाणी पातळी मीटर) कबीर मठ पायथा, जुनी नगरपालिका इमारत या ठिकाणी सुमारे 1 ते 1.5 फुट पाणी येते. 3 लाख 25 हजार क्युसेक विसर्ग आल्यावर (448.200 पाणी पातळी मीटर) दत्तघाट, माहेश्वरी धर्मशाळा, महाव्दार घाट, कालिका मंदिर चौक या भागात सुमारे 1 फुट पाणी येण्यास सुरुवात होते. असे भीमा पाटबंधारे विभागाचे कार्यकारी अभियंता एस.के हरसुरे यांनी सांगितले तसेच वाढता विसर्ग पाहता नागरिकांनी सतर्कता बाळगावी असे आवाहनही त्यांनी यावेळी केले.

# शांतता रॅली मनोज जरांगे यांचे बारा वाजता होणार आगमन

## पोवाड्याच्या माध्यमातून मनोज जरांगे पाटील यांचा संघर्ष देखील सादर होणार

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** मराठा आरक्षण व कुणबी मध्ये सग्या सोयऱ्यांचा समावेश करावा या मागणीसाठी मराठा संघर्ष योद्धा मनोज जरांगे पाटील यांच्या नेतृत्वाखाली सुरू असलेल्या आंदोलन अंतर्गत शांतता रॅलीच्या दुसऱ्या टप्प्याची सुरुवात बुधवार ७ ऑगस्ट रोजी सोलापुरातून होणार असून या शांतता रॅलीसाठी जरांगे पाटील यांचे दुपारी बारा वाजता येथील छत्रपती संभाजी महाराज चौकात आगमन होणार आहे.




छत्रपती संभाजी महाराजांच्या पुतळ्यास पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात येणार आहे. त्यानंतर तेथून ते रॅलीने छत्रपती शिवाजी महाराज चौकातील शिवरायांच्या अश्वारूढ पुतळ्यास अभिवादन करणार आहेत. त्यानंतर तेथेच उभारण्यात आलेल्या भव्य व्यासपीठावरून ते मराठा समाज बांधवांना संबोधीत करणार आहेत.

दरम्यान सकाळपासून जरांगे पाटील यांचे आगमन होईपर्यंत शिवशाहीर यांची तोफ धडाडणार आहे. छत्रपती शिवाजी महाराज चौकात अरविंद घोगरे हे शिवशाहीर विविध पोवाड्याच्या माध्यमातून छत्रपती शिवाजी महाराज, तसेच मराठ्यांचा इतिहास सादर करणार आहेत. याशिवाय मनोज जरांगे पाटील यांच्या संघर्षाची कहाणीही ते ऐकवणार आहेत. तसेच छत्रपती संभाजी महाराज चौकात सकाळच्या सत्रामध्ये सोलापूरचे तरुण शिवशाहीर ... यांचे पोवाडे ऐकायला मिळणार आहेत.

(पान 2 वर..)

सभेनंतर जरांगे पाटील यांचा सोलापुरात रात्री मुक्काम राहणार आहे. मुक्कामाला त्यांच्या समवेत आलेले शंभर सहकारी विजापूर रोडवरील मयूर वन मंगल कार्यालयात मुक्कामास असणार आहेत. तर जरांगे पाटील यांच्यासाठी खास एक बंगलो राखीव ठेवण्यात आला आहे. त्या बंगल्यामध्ये ते मोजक्या समर्थकांसह मुक्काम करणार आहेत. दुसऱ्या दिवशी सकाळी कामती मार्गे मंगळवेढा कडे रवाना होणार आहेत.

मनोज जरांगे यांच्या सभेसाठी छत्रपती शिवाजी महाराज चौकात भव्य गोलाकार पद्धतीचे व्यासपीठ उभारणीचे काम पूर्ण झाले असून त्याला अंतिम स्वरूप देण्यात येत आहे. या व्यासपीठावर लेजर शो ची व्यवस्था करण्यात आली असून जरांगे पाटलांच्या आगमनाच्या वेळी या लेझर शोचा आणि आतिषबाजी केली जाणार आहे.




# अनगर येथील अप्पर तहसिल कार्यालयाला विरोध

# मोहोळ येथे व्यापाऱ्यांचा बेमुदत बंद

## मोहोळ तालुका बचाव संघर्ष समितीचा सहभाग

**पोखरापूर :** मोहोळ तालुक्यातील अनगर येथे मंजूर झालेल्या अप्पर तहसील कार्यालयाच्या समर्थनार्थ धरणे आंदोलन करण्यासंदर्भात विचार विनिमय करण्यासाठी मोहोळ तालुक्यातील कार्यकर्ते, नेते, पदाधिकारी यांची महत्त्वाची बैठक मोहोळ येथील कृषी उत्पन्न बाजार समितीत आयोजित केली होती. त्या बैठकीला विरोध म्हणून मोहोळ शहरातील व्यापाऱ्यांनी उत्स्फूर्तपणे कडकडीत बंद पाळत अनगरच्या अप्पर तहसील कार्यालयाला विरोध दर्शविला.

### मोहोळ शहर कडकडीत बंद

मागील आठ दिवसांपासून अनगर येथील अप्पर तहसील कार्यालयाचा विषय मोहोळ तालुक्यात चांगलाच तापला असून यापूर्वी मोहोळ शहर तसेच पेनुर, नरखेड व शेटफळ अशी तालुक्यातील प्रमुख गावे बंद पाळून त्या अप्पर तहसील कार्यालयाच्या विरोधात भूमिका दर्शविण्यात आली होती. रविवारपासून मोहोळ तहसील कार्यालयासमोर धरणे आंदोलन ही सुरू आहे. आज अप्पर तहसील कार्यालयाच्या समर्थनार्थ बैठक असल्याचे समजतात व्यापाऱ्यांनी उत्स्फूर्तपणे आठवड्याचा पहिला दिवस असलेल्या सोमवारी मोहोळ शहर कडकडीत बंद केले. व धरणे आंदोलनाला पाठिंबा दिला. यावेळी मोहोळ शहरातील व्यापारी, नागरिक व मोहोळ बचाव संघर्ष समितीचे सदस्य उपस्थित होते.



**...तोपर्यंत सर्व व्यापाऱ्यांचा बेमुदत बंद पाळून पाठिंबा**

अनगरच्या अप्पर तहसील कार्यालयाच्या निषेधार्थ मोहोळ शहरात सोमवारी कडकडीत बंद पाळण्यात आल्यानंतर चेंबर ऑफ कॉमर्सच्या वतीने ही मोहोळ तालुका बचाव संघर्ष समितीच्या वतीने सुरू असलेल्या धरणे आंदोलनाला पाठिंबा देत जोपर्यंत तेथील अप्पर तहसील कार्यालय रद्द होत नाही. तोपर्यंत सर्व व्यापारी बेमुदत बंद पाळून पाठिंबा देतील, अशी भूमिका व्यापाऱ्यांनी जाहीर केली.

अन्याय करून अप्पर तहसिल कार्यालय अनगर येथे नेले आहे. सगळ्या व्यापाऱ्यांचे आर्थिक नुकसान होणार आहे. त्यामुळे मोहोळच्या सगळ्या व्यापाऱ्यांनी आज उत्स्फूर्तपणे बंद ठेवला आहे. जोपर्यंत तो निर्णय रद्द होत नाही तोपर्यंत बेमुदत बंदला आमचा पाठिंबा आहे. आमच्यावर कोणाचाही कसलाही दबाव नाही.

**- सुरज गायकवाड,** व्यापारी, मोहोळ


निरामय पॅरालिसिस सेंटर
निरामय आयुर्वेद, पंचकर्म, योगा आणि फिजिओथेरपी सेंटर
कितीही जुने पॅरालिसिस असो, आयुर्वेदिक उपचार पद्धतीने १५ ते २० दिवसानंतर रिझल्ट येण्यास सुरुवात होते.
हात काम करत नाही, चालता येत नाही, ब्रेनचा कंट्रोल जाणे ,बेडवर आहात? काळजी करू नका.. खात्रीशीर उपचार १००% गॅरंटी आयुर्वेदिक तज्ञांच्या निगराणीमध्ये
नातं आपुलकीचं,विश्वासाचं,जिव्हाळ्याचं, माणुसकीच अन् आधाराचं..
समाजातील प्रत्येक घटकाशी आपूलकीचे व माणूसकीचं नात जपणारी संस्था
खंडोबा माळ रोड, लोहगाव, पुणे
संपर्क: 9503310568



After 10th & 12th
Hotel Management
BOOK YOUR SEAT NOW
Limited Seats...Hurry
Diploma - Govt Approved Two Year Course
Degree - UGC Approved Three Year Course
ADMISSION STARTED 2024-25
Be All rounder
Be Executive Chef,
Be General Manager,
Be Executive Engineer,
Be Account Manager
Be Best Bar Tender
Be F & B Manager
with Only One Course
100% JOB Guaranty
Earn & Learn
• With 2+ Years Experience
• Earn 10000+ Per Month
• Education loan @ 0 %
• Scholorship for Boys/Girls
• Foreign Languages
• 100+ Practicals
• Visits/Five Star Hotels/Wineries
INDEX
★★★★★
College of Hotel Management
Visit
Prime Point building , beside bharat petrol pump, shewalwadi phata, hadapsar, pune -411037
Web-www.iindexhospitality.com
9970667166, 9970669566

## संपादकीय

# पावसाची लहर

देशातील नैसर्गिकदृष्ट्या सगळयात सुंदर भागांपैकी एक मानल्या गेलेल्या केरळमध्ये पावसाने धुमाकूळ घातला. वायनाड जिल्ह्यात त्याने कहर केला. भूस्खलनामुळे अनेक गावेच्या गावे वाहून गेली. दीडशेपेक्षा जास्त लोकांचा यात मृत्यू झाला. अनेक नागरिक अजूनही जमिनीखाली गाडले गेले असल्याची शक्यता वर्तवण्यात आली आहे. साधारण दहा वर्षांपूर्वी महाराष्ट्रात माळीण येथे अशीच हाहाकार माजवणारी घटना घडली होती. अख्खे गाव जमिनीखाली गेले होते. तसाच प्रकार वायनाडच्या चार गावांमध्ये झाला आहे यावरून घटनेची भीषणता समजावी. प्रचंड पाऊस आणि लहरी हवामान यामागे शास्त्रीय कारण आहे. त्यातले सगळयात मुख्य कारण आहे पृथ्वीचे वाढते तापमान आणि त्याला मानवी हस्तक्षेपच प्रामुख्याने जबाबदार आहे. दुर्दैवाची बाब अशी की असामान्यपणे वाढत असलेल्या तापमानवाढीकडे आजही दुर्लक्ष केले जाते आहे.
वाढत्या तापमानामुळेच पश्चिम घाटाच्या आसपासच्या भागात अचानक मुसळधार पाऊस होऊ लागला आहे. या परिसरात महाराष्ट्र, गोवा, कर्नाटक, केरळ आणि तामिळनाडूचा काही भाग येतो. हा सगळा परिसर जैवविविधतेच्या दृष्टीने अत्यंत संपन्न आहे, मात्र तेवढाच संवेदनशीलही. आज पृथ्वीचे तापमान गेल्या पाच-साडेपाच दशकांच्या तुलनेत तिप्पट वेगाने वाढते आहे. मानवाच्या अमर्याद गरजा आणि भौतिक सुविधांसाठी त्याने केलेले नैसर्गिक स्रोतांवरचे आक्रमण हेच या सगळयाच्या मुळाशी आहे. भारतात आणि जगात निसगार्चा रौद्रावतार दाखवर्णाया ज्या घटना सातत्याने घडत आहेत त्यामागच्या कारणांचा शोध घेत गेला तर तो कुठेतरी मानवी वस्तीपाशीच येऊन थांबतो. घरात आपण वापरत असलेल्या वस्तू आणि उपकरणे ही गरज झाली असल्याचे लाख म्हटले गेले तरी ही निसर्गाच्या दृष्टीने चैनच असून त्याचा टॅक्स तो मानवाकडून वसूल करतो आहे. मध्यंतरी एक आकडेवारी देण्यात आली. त्याच्या सत्यतेची पुष्टी झाली नसली तरी असे म्हटले गेले आहे की पृथ्वीचे तापमान असेच वाढत राहिले तर आपली शेती नष्ट होण्याचा धोका आहे. जर तापमान एक अंश सेल्सियसने वाढले तर थंडीच्या काळात शेतर्कयांच्या उत्पन्नात 6.2 टक्क्यांनी घट होते. हा झाला केवळ हवामान बदलाचा, त्यामागील कारणाचा आणि त्याच्या गंभीर परिणामांच्या शक्यतेचा भाग. या हवामानामुळे खरेतर त्याला लहरी म्हणणेच चूक कारण त्यात त्याचा काही दोष नाही. जे आपण निसगार्ला देत आहोत तेच तो आपल्याला सव्याज परत करतो आहे. याचा रोजच्या जीवनात आपल्याला फटका बसतो. पूर्वी पावसाळा गारवा देणारा, सुखावह होता. हल्ली पावसाच्या नुसत्या नावाने आणि त्याने सलग ताल धरला तरी भीती वाटते.
आज उत्तर भारतातील कुलूपासून दक्षिणेच्या केरळपर्यंत त्याने नुकसान केले आहे. देशाच्या राजधानी दिल्लीत केवळ 24 तासांतच त्याने 10 बळी घेतले. संपूर्ण देशभरात केरळची संख्या वगळून केवळ बुधवार आणि गुरुवार या दोन दिवसांत 60 ते 70 जणांचे मृत्यू झाले आहेत. वायनाडमधील मृतांची संख्या 300 चा आकडा गाठू शकते. या लोकांना वाचवता येणे शक्य नव्हते का? त्यांच्या मृत्यूची जबाबदारी कोणीच घेणार नाही का? बरे दुर्घटना घडल्यावर नेहमीप्रमाणे राज्ये आणि केंद्र सरकार यांच्यात आरोप-प्रत्यारोप होतात. वास्तविक भारतात हवामानाच्या संदर्भात सर्वंकषपणे अभ्यास करण्याची आणि त्यानुरूप आचरण करण्याची आवश्यकता आहे. कधी प्रचंड उकाडा, दुष्काळ तर कधी प्रचंड पाऊस हा विरोधाभास स्वीकारतच आपण पुढे चाललो आहोत, मात्र आपण कुठपर्यंत हे स्वीकारू शकणार आहे.
मुळात आपली अजून किती संकटांचा सामना करण्याची क्षमता राहिली आहे? हवामान विभागाच्या म्हणण्यानुसार जुलै महिन्यात बिहार, झारखंड, दिल्ली, हिमाचल, पंजाब आणि हरियाणात 20 ते 59 टक्के कमी पाऊस झाला आहे. इशान्येकडेही सिक्कीम आणि मेघालय सोडले तर अन्य ठिकाणी तो कमीच आहे. या महिन्यात केवळ गुजरात, गोवा, कर्नाटक आणि महाराष्ट्र या पट्ट्यात प्रचंड पाऊस झाला आहे. ऑगस्ट महिना सुरू झाला आहे. अख्खा महिना जायचा असल्यामुळे काही राज्यांत भीती आहे तर उर्वरित राज्यात पावसाबद्दल आतुरता असे संमिश्र चित्र आज देशात दिसते आहे. ऑगस्टमध्ये देशभरात 94 ते 106 टक्के असा सामान्य मयार्देत पाऊस असण्याचा अंदाज आहे. तथापि, तो सगळीकडे एकसमान आणि शिस्तीत कोसळणार नाही. त्यातही प्रचंड जास्त आणि अगदीच कमी या न्यायाने तो कृपा आणि अवकृपा दोन्ही करेल. आता सगळयात महत्त्वाचा प्रश्न हाच आहे की पावसामुळे जी जीवितहानी होते आहे ती रोखली कशी जाईल? भारतातील प्रमुख शहरांमधील स्थिती आज कोणापासूनही लपून राहिलेली नाही. अत्यंत सामान्य पावसाचा मुकाबला करण्याचीही कुवत शहरांकडे राहिलेली नाही. ही केवळ मुंबई, दिल्ली अथवा पुण्याची स्थिती नाही तर स्मार्ट म्हणवर्णाया किंवा म्हणवून घेण्याची इच्छा असलेल्या प्रत्येक शहराची हीच स्थिती आहे. शहराला ज्या विविध बाबी सुविधा म्हणून पुरवल्या जातात त्यांचे उघडेपणही धोक्याची बेटेच होत चालले आहे. कोणीही कोणत्याही गाफील क्षणी एखाद्या गंभीर अपघाताला बळी ठरू शकतो. देशभरातील मोजकी शहरे स्मार्ट करण्यापेक्षा काही मोजकी शहरी सुरुवातीच्या टप्प्यात पावसाचे संकट झेलण्यास अगोदर सक्षम केली जावी व त्यांचा आदर्श अन्य शहरांसमोर ठेवून त्यांना त्याचे अनुकरण करायला लावावे हाच यावर तोडगा ठरू शकतो.

पान १ वरून

## शांतता रॅली मनोज जरांगे यांचे...

सभेनंतर जरांगे पाटील हे आपल्या निवडक समर्थकांसह पार्क चौकातील डॉ बाबासाहेब आंबेडकर, लोकशाहीर अण्णाभाऊ साठे आणि अहिल्यादेवी होळकर आदी महामानवांना अभिवादन करणार आहेत. सोलापूरचे चार हुतात्मे या महामानवांना अभिवादन देखील करणार आहेत ही शांतता रॅली यशस्वी करण्यासाठी मराठा क्रांती मोर्चाचे अमोल शिंदे, दास शेळके, अनंत जाधव, रवी मोहिते, श्रीकांत घाडगे, शेखर फंड, विजय पोखरकर, महेश सावंत, बाळासाहेब गायकवाड, दिलीप कोल्हे परिश्रम घेत आहेत.

### वात्रटिका

### सन्मान यात्रा

राजकीय तमाशा झाला
जमली होती मोठी जत्रा...
आता निघणार आहे म्हणे
महाराष्ट्रात सन्मान यात्रा...
खेळ खंडोबा झाला आणि
सन्मान धुळीस मिळाला...
महाराष्ट्रातील जनतेला
एक ना एक नेता कळाला...

**हणमंत पडवळ,**
धाराशिव,
8698067566

# सुख जवापाडे दुःख पर्वताएवढे

जगातील सर्वात मोठी लोकशाही म्हणून ओळख असलेल्या भारत देशात वर्तमान काळात तितकीच आव्हाने आहेत हे पण खर आहे, आपल्या देशात थोर संत महात्मे जन्माला आले हे आपले भाग्य आहे.
एका संस्कृत वचनात सांगितल्याप्रमाणे 'अहिंसासत्यास्त्येयब्रह्मचर्यपरिग्रता म्हणजे ८६ कोटी योनी जन्मानंतर आपल्याला मानव जन्म भेटलेल्या मानवाने आपल्यामुळे इतराला त्रास होईल असे वर्तन करू नये, आपले आचरण स्वच्छ ठेवून सदैव सत्याचा पुरस्कार करावा पण असे घडत नाही.
माणसामाणसातील प्रामाणिकता आज लोप पावत चालली आहे.
माझा जन्म ही सर्वप्रथम एक मोठी दुर्घटना आहे असे बोलणाऱ्या जे. जे.रुसो यांनी १७५४ मध्ये समानतेच्या संकल्पनेला जन्म दिला पण ही मूल्ये जोपासली जात नाहीत ही खेदाची गोष्ट म्हणावी लागेल, मागील काही वर्षात स्त्रियांवरील अत्याचारात वाढ झाली आहे

' जरी शत्रुकांता प्रसंगी दिसेल
तिला साडीचोळीनिशी पाठवील;
कधी स्वप्नी न पाप स्पर्श मनाला
जरी शत्रुची माय, कांता(बायको), बहिण
तिला मानतो जन्मदा मायबहिण '

वरील ओळी प्रमाणे कल्याणच्या सुभेदाराच्या सुनेला साडीचोळीचा आहेर देऊन तिला सुखरूप घरी पोहच करणारे आणि स्वराज्यातील प्रत्येक स्त्रीला देवाच्या देव्हाऱ्यात जागा देणारे छत्रपती शिवरायांच्या विचार जोपासण्याचा आजची पिढी अनभिज्ञ झाली आहे
आज त्याच भूमीत आज कोपर्डी, उंनाव, कठुवा आणि अगदी ठाण्यातील लव जिहाद चे प्रकरणातून एका हिंदू मुलीची झालेली निर्घृण हत्या हे सगळं पाहताना आपण राजेंच्या विचारला तिलांजली देत आहोत याची प्रचिती येत आहे, धर्मवेड हा मेंदूला झालेला एक रोग आहे, जो धर्म दुखितांचे अश्रू पुसत नाही , जो भुकेल्या व्यक्तीच्या पोटात अन्नाचा कण घालू शकत नाही तो धर्म का म्हणायच.

ऊस डोंगा परी रस नव्हे डोंगा।
काय भुललासी वरलीया रंगा ॥१॥
कमान डोंगी परी तीर नोहे डोंगा।
काय भुललासी वरलीया रंगा ॥२॥
नदी डोंगी परी जळ नव्हे डोंगें ।
काय भुललासी वरलिया रंगें ॥३॥
चोखा डोंगा परी भाव नव्हे डोंगा।
काय भुललासी वरलिया रंगा ॥

ऊस डोंगा परी रस नोहे डोंगा.डोंगा म्हणजे वाकडा तिकडा ऊस दिसतांना जरी वाकडा तिकडा दिसत असला तरी त्याचा रस मात्र गोडच असतो. रसाची गोडी वाकडी-तिकडी नसते. म्हणून आपण वरवरच्या रंगाला भुलू नये. फसू नये. रंग आणि आकार ह्या दोन्ही गोष्टी म्हणजे बाहेरचे आवरण.ते अगदी वरवरचे स्तर आहेत. त्यालाच आपण फशी पडलो तर गाभ्यातल्या मूळ तत्त्वाशी आपली भेट होणार नाही.
म्हणून बाह्य सौंदयार्ला बळी न पडता आपण मनाच्या अंतरंगाचा जो डोह आहे त्यात आपण बुडाले पाहिजे
पुढील आठवड्यात आपण स्वतंत्रदिवस साजरा करू आणि संविधान प्रस्तविकेचे वाचन करताना त्यातील आपण मूल्ये अंगीकृत केली आहेत का ?
कल्याणकारी राज्याची बीजे रुजली आहेत याचा पण आपण विचार करायला हवा.....
भारतरत्न डॉ बाबासाहेब आंबेडकर यांनी संविधानामध्ये कलम १९ मध्ये स्पष्ट सांगितले आहे की आपल्याला अभिव्यक्ती स्वातंत्र्य आहे सोबत कलम २१ चा दाखला देत असे पण सांगितले आहे की प्रत्येकाला वैयक्तिक स्वातंत्र्याचा अधिकार असून स्वतंत्र आणि सन्मानाने जगन्याचा अधिकार आहे पण या घटनेवरून आपण त्यांच्या मूलभूत अधिकारांना तिलांजली देत आहोत असे जाणवते....
प्रेम करायच कि नाही हा प्रत्येकाचा खाजगी प्रश्न आहे, प्रत्येकासाठी प्रत्येकाचं प्रेम आणि प्रेमाची व्याख्या वेगळी असू शकते, आणि प्रेम करू नये असे मी अजिबात बोलणार नाही कारण एवढे भंगार विचार आपले नाहीत प्रेम जरूर करावे पण त्याला देखील क्वालिटी असावी प्रेमविवाह करणार असाल तर दोघांची २ वेळेची जेवणाची सोय होईल का याचा पण विचार करायला हवा कारण खिशात दमडी नसताना आपण संसार उभा करू असे दिवास्वप्न पाहणारे त्यांच्या वाट्याला शेवटी दुःख येते
कवी कुसुमाग्रज म्हणतात की

"पुरे झाले चंद्र-सुर्य, पुरे झाल्या तारा,
पुरे झाले नदी नाले, पुरे झाला वारा
मोरासारखा छाती काढून उभा राहा,
जाळासारखा नजरेत नजर बांधून पाहा
सांग तिला, तुज्या मिठीत स्वर्ग आहे सारा
म्हणून म्हणतो जागा हो जाण्यापूर्वी वेळ,
प्रेम नाही अक्षरांच्या भातुकलीचा खेळ
प्रेम म्हणजे वणवा होउन जाळत जाणं,
प्रेम म्हणजे जंगल होऊन जळत राहाणं
प्रेम कर भिल्लासारखं बाणावरती खोचलेलं,
मातीमध्ये उगवून सुद्धा मेघापर्यंत पोहोचलेलं
शब्दांच्या या धुक्यामधे अडकु नकोस,
बुरूजावरती झेंड्यासारखा फडकू नकोस
उधळून दे तुफान सारं मनामधे साचलेलं,
प्रेम कर भिल्लासारखं बाणावरती खोचलेलं" !

शेवटी माणूसच एकमेकांचा जीव घेतो, कुठली आहे जात? कारण आपण जे अन्न खातो त्याला जात आहे का उच्च नीच भेद करणारे सगळे भाजी भाकरी खातात त्या भाकरीला आहे का कोणती जात?
जर प्रेम पूर्णत्वाकडे घेऊन जाता येत असेल तरच प्रेम जरूर करावे कारण एखादी इच्छित गोष्ट जर आपल्याला भेटली नाही तर जो होणारा त्रास आणि ती व्यक्ती नाही भेटली याची सल ही आयुष्यभर असते
संत तुकाराम महाराज म्हणतात "जावे त्यांच्या वंशा तेव्हा कळे;
जेव्हा सुख पाहता जवापाडे, दुःख पर्वताएवढे".
त्या अभंगातील वरील उक्तीचा अर्थ असा कि जर जर जीवनात आपण पाहिले तर सुख हे जवापाडे म्हणजे जवसाच्या एका दाण्याएवढे आणि दुःख हे खुप मोठे म्हणजे एखाद्या उंच पर्वताएवढे आहे. कारण वाट्याला आलेलं भोग हे पोटाला सांगता येत नसतात
आणि हेच आयुष्य आहे आणि हे चालत राहणार पण आपण समोरील भविष्य पाहून हळूहळू का होईना बदल करायला हवा कारण काही केले तरी " जाता जात नसते ती 'जात 'असते याची प्रचिती याची देहा याची डोळा आपल्यास मागील आठवड्यातील दोन ऑनर किलिंग प्रसंगावरून दिसून येते आणि हे निश्चितच आपल्याला विचार करण्यासारखे आहे.



**- दत्तात्रय महादेवी पोपट पाचकवडे - पाटील**
चिखर्डे (ता. बार्शी जि.सोलापूर)

### प्रबोधन

# धन्य क्रांतिसिंह। खरा देशभक्त

ब्रिटिश पार्लमेंटच्या एकत सदस्याने १९४५मध्ये प्रधानमंत्री चर्चिलना एक नामुष्कीचा लाजिरवाणा प्रश्न विचारला होता की, 'सातारा जिल्ह्यात नाना पाटील यांच्या नेतृत्वाखाली समांतर सरकार चालतं, हे खरं आहे का?' आपल्या ब्रिटिश साम्राज्यावर सूर्य कधी मावळत नाही, अशी घमेंड बाळगणाऱ्या चर्चिलना शरमेने काही तरी थातूरमातूर उत्तर देऊन वेळ मारून न्यावी लागली होती. पण १९४२ ते १९४५ अशी तीन वर्ष ब्रिटिश साम्राज्यावरील सूर्य सातारा-सांगली परिसरातील प्रतिसरकारध्या राज्यात अस्तगंत झाला होता. पक्षपाती, जातीयवादी इतिहासकारांना आधुनिक भारताच्या इतिहासातील हे सोनेरी पान दिसलं नसेल, परंतु प्रा.ग.प्र.प्रधान मात्र प्रामाणिकपणे म्हणतात, 'म्हणजेच नाना पाटलांचं नाव सातासमुद्रापलीकडे गाजलं.' ऋषितुल्य समाजवादी नेते एस.एम. जोशी क्रांतीसिंह नाना पाटील यांचा गौरवपूर्ण उल्लेख करताना म्हणतात, 'नाना पाटील हे प्रतिसरकारचे अनभिषिक्त राजेच होते. लोक महाराज म्हणून त्यांना संबोधित असत.' या महाराजांकडे स्वतःचं तुफान सेना नावाचं सैन्यही होतं.
महात्मा गांधी की जय, भारतमाता की जय अशा गर्जनेने आपल्या सभेचा प्रारंभ करणारे क्रांतिसिंह महात्माजींची निःशस्त्र क्रांती आणि क्रांतिकारकांची सशस्त्र क्रांती यांचा सुवर्णमध्य साधणारे एकमेवाद्वितीय अजब समन्वयवादी रसायन होते. म्हणूनच परंतु या सम हा असंच त्यांचं वर्णन इतिहासाला करावं लागेल. क्रांतिसिंह आपली ऐतिहासिक भूमिका स्पष्ट करताना म्हणायचे, 'मी ज्या खांद्यावर गांधीजींचा चरखाधारी तिरंगा घेतला आहे, त्याच खांद्यावर मी समजूनउमजून मार्क्सचा लाल बावटा घेतला आहे.' नाना पाटील हे एक तत्त्वनिष्ठ, ध्येयवेडे, समर्पित देशभक्त होते. क्रांतिसिंह नाना पाटलांच्या स्वातंत्र्य संग्रामातील सभा हे एक वेगळंच ओजपूर्ण, चैतन्यपूर्ण, प्रकरण होतं; नाट्यपूर्ण दवंडीने सभेची वार्ता जनमनावर पडत असे. ऐका हो ऐका, आज रात्री जेवल्या-खाल्ल्यावर चावडीच्या म्होरं नाना पाटलांची सभा हाय होऽऽऽ! अशी दवंडी देत स्वतः नाना पाटील आपल्या भाषणाची जाहिरात करायचे. महाराष्ट्राच्या इतिहासाला असा दुसरा वक्ता माहीत नाही. दवंडी ऐकलेली माणसं चावडीकडे अशी धाव घ्यायची की, मैदान तुडुंब भरून ओसंडू लागायचं भाई माधवराव बागल लिहितात, 'नाना पाटलांची सभा असेल तेथे जनसमुद्राला उधाणाची अशी येई भरती की, तिच्या पुढे साऱ्या देवांच्या जत्रा फिक्या पडत !' मात्र क्रांतिसिंह नाना पाटील जनतेमधील जनार्दनाचेच निःसीम भक्त होते. ते म्हणायचे, 'माझा देव मी मानला आहे. या मातीतला माणूस! माझं रामायण आहे-साम्यवाद! माझ्या देवाकडे मला नेणारा दूत आहे-कार्ल मार्क्स! माणसाला माणूस म्हणून जगू देणं, हे माणसाच्याच हातात आहे. देव, देश, धर्म, सुबत्ता हे सारं माणसांसाठीच आहे!'
नाना पाटील प्रखर बुद्धिजीवी होते, म्हणूनच त्यांचे विचार रूढी-परंपरा-अंधश्रद्धेविरुद्ध लोकजागृती करीत असत. ते म्हणायचे, 'आपण पिंपळाला पार बांधतो, त्याची पूजा करतो पण या झाडाचा आपणाला काय उपयोग? आता पार बांधायचा बाभळीला कारण या झाडाचे हजारो उपयोग आहेत काड्यांनी दात घासता येतात. पाला व शेंगा शेळ्या-मेंढ्यांना खाता येतात. टणक लाकडापासून शेतकऱ्यांची औजार होतात. काट्यांच्या फांद्यांचं कुंपण होतं आणि काट्यांनी पायातले काटे काढता येतात म्हणून पार बांधायचा बाभळीला, पिंपळाला नाही!'
समाजातील अंधश्रद्धांनाच नव्हे तर दारू, जुगार, सावकारी, दरोडेखोरी, काळाबाजार, जुलूम, जबरदस्ती, गुंडागर्दी या सर्व समाजद्रोही कृत्यांना नाना पाटलांच्या प्रतिसरकारने असा तडाखा दिला की बरसा तीन वर्षांच्या प्रशासनाने नाना पाटील आबालवृद्धांचे, माताभगिनींचे दैवत झाले. दंतकथांचे नायक झाले. त्यांनी संपूर्ण सातारा जिल्ह्यात प्रतिसरकारचं राज्य सुरू केलं नानांनी जिल्ह्यातील सुमारे सातशे खेड्यात ग्रामराज्य स्थापन केलं, न्यायदान कमिट्या अस्तित्वात आणल्या कज्जाखटल्यांचे निकाल त्वरित होऊ लागले, चोऱ्या चपाट्यांचं नावही राहिलं नाही. दारूचे गुडे, जुगार, व्यभिचार, भ्रष्टाचार औषधालाही राहिला नाही. हुंडा न घेता, साध्या पद्धतीच्या गांधी लग्नाची प्रथा समाजात लोकप्रिय झाली. सरकारी कोर्ट बंद पडली शांतता, सुव्यवस्थेने समाज निश्चिंत झाला.
२६ मे १९४६ ला क्रांतिसिंह नाना पाटीलांचा मुंबईच्या शिवाजी शर्क मैदानावर मा. विनायक यांनी उभारलेल्या अतिभव्य स्टेजवर झालेला सत्कार केवळ अविस्मरणीय आणि आजपर्यंतच्या सर्व सभांचे विक्रम मोडीत काढणारा होता. मैदान अपुरे पडलं. आचार्य अत्रे यांच्या नवयुगने दिलेल्या वृत्तानुसार-नानांच्या गळ्यात पडलेल्या हारांनी दोन ट्रक गच्च भरले.
क्रांतिसिंह नाना पाटील स्वातंत्र्य चळवळीतील एक युगपरिवर्तनकारी व्यक्तिमत्त्व होते, ते आपल्या पदवीबद्दल अभिमानाने म्हणत, जनतेने स्वयंस्फूर्तीने दिलेली 'क्रांतिसिंह' ही पदवी मला लाखो रुपये किंमतीची वाटते. गरिबांच्या उद्धारासाठी काँग्रेससारख्या लाभदायक पक्षावर लाथ मारून कम्युनिस्ट पक्ष स्वीकारणाऱ्या या देशभक्ताने आपल्या जीवनाचं उदात्त ध्येय स्पष्ट केलं, जगायचं तर या तिरंगी झेंड्यासाठीच आणि मरायचं तर या तिरंगी झेंड्यासाठीच! असा थोर महापुरुष...

थोर गांधीनिष्ठ । थोर मार्क्सनिष्ठ
थोर देशनिष्ठ । क्रांतिसिंह ॥१
प्रतिसरकार । स्थापूनी चालवी
दृष्टी दिली नवी । भारताला ॥२
तत्त्व व्यवहार । दोन्हीही साधले
समाजाचे भले । करण्यास ॥३
गरिबांचे हित । हाच घेई ध्यास
कष्टे रात्रंदिवस । त्यांच्या सुखा ॥४
स्वतःच्या सुखाला । तिलांजली देई
वनवासी होई । देशासाठी ॥५
ब्रिटिश सत्तेचा । सूर्यास्त जाहला
नानांच्या शौर्याला । सीमा नाही ॥६
धन्य क्रांतिसिंह । खरा देशभक्त
देशहितरत । वंदू त्यांना ॥७



**प्रा.डॉ.जे.बी.शिंदे**

# जिल्ह्यात प्रत्येक तालुक्यात दुध प्रक्रिया केंद्र सुरू करा

## खासदार नीलेश लंके यांची संसदेत आग्रही मागणी



**नगर (कटूसत्य वृत्त):-** दुध उत्पादनात महाराष्ट्रात नगर जिल्हा हा सर्वाधिक दुध उत्पादन करणारा जिल्हा असल्याने केंद्र सरकारने प्रायोगिक तत्वावर जिल्यातील प्रत्येक तालुक्यात दुध प्रक्रिया केंद्र सुरू करण्याची आग्रही मागणी खासदार नीलेश लंके यांनी सोमवारी संसदेमध्ये केली. यावेळी बोलताना लंके यांनी सांगितले की, प्रत्येक तालुक्यात दुध प्रक्रिया केंद्र सुरू झाल्यानंतर तालुकास्तरावर विविध उत्पादने तयार करून दुधाला स्थिर आणि सातत्यपूर्ण बाजारभाव मिळण्यास मदत होईल. शेतकऱ्यांना विश्वासार्ह उत्पन्न मिळू शकेल. हा प्रयोग शंभर टक्के यशस्वी होईल असा विश्वास व्यक्त करतानाच या यशस्वी प्रयोगानंतर देशभरात मागणीनुसार यंत्रणा उभी करता येईल असे लंके यांनी सांगितले.
खा. लंके पुढे म्हणाले, प्रक्रिया यंत्रणा उपलब्ध असल्यास कच्च्या दुधाचे चीज, लोणी, तुप आणि दुध पावडर अशा विविध दुग्धजन्य उत्पादनांमध्ये रूपांतर केले जाऊ शकते. यामुळे दुधाचे सेल्फ लाईफ वाढेल आणि मुल्यवर्धन होऊन शेतकऱ्यांना आर्थिक लाभ देखील होऊ शकेल असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

**राज्य सरकारच्या नाकर्तेपणामुळे महानंदा राज्याबाहेर**

महाराष्ट्रातील शेतकऱ्यांनी उभी केलेली महानंदा डेअरी एनडीडीबीकडे सोपविण्याचा निर्णय घेण्यात येऊन ती प्रक्रिया देखील पुर्ण करण्यात आली आहे. दुध व्यवसायाच्या क्षेत्रातील सर्वात मोठी आणि शेतकऱ्यांच्या हक्काची ही संस्था केवळ राजकीय इच्छाशक्ती अभावी राज्याच्या बाहेर गेली ही अतिशय दुर्देवी आणि सरकारचा दुग्ध व्यवसायाकडे पाहण्याचा दृष्टीकोन कसा आहे ही सांगणारी बाब असल्याचा आरोप खा. लंके यांनी केला. आमच्या हक्काची डेअरी राज्य सरकारच्या नाकर्तेपणामुळे राज्याबाहेर गेली. त्यामुळे शेतकऱ्यांनी मेहनतीने उभा केलेला दुग्ध व्यवसाय पोरका झाल्याच्या अवस्थेत असल्याचे खा. लंके यांनी आपल्या भाषणात सांगितले.

**अर्थसंकल्पात दुग्धव्यवसायासाठी उपाययोजना आवष्यक होत्या**

केंद्रीय अर्थसंकल्पात दुग्ध व्यवसायास सहाय्य करण्यासाठी काही उपाय योजना करणे गरजेचे होते. पायाभुत सुविधांसाठी वाढीव निधी, अनुदान तसेच मदत मिळेल अशा योजनांचा समावेश करणे गरजेचे होते. दुग्धव्यवसाय, दुधाच्या किंमतीमधील चढ उतार, अपुऱ्या पायाभुत सुविधा आणि जनावरांचे आजार अशा समस्यांना दुध उत्पादक सामोरा जात आहे.

**दुधाला किमान आधारभुत कितीच्या कक्षेत आणा**

आमचा शेतकरी भल्या पहाटे उठून गोठयातील गाई म्हशींचे दुध काढतो. दुध घेऊन शेतकरी ज्यावेळी दुध डेअरीमध्ये जातो त्यावेळी दुधाला चांगला भाव मिळेत अशी त्यास अपेक्षा असते. प्रत्यक्षात तसे होत नाही. गाईच्या दुधाचा ३३ रुपए ५० पैसे ते ३५ रुपए तर म्हशीच्या दुधाचा उत्पादन खर्च ५५ रुपए इतका आहे. त्यामुळे आज जो भाव मिळतो त्यातून उत्पादन खर्च हाती पडत नाही. त्यासाठी दुधाला किमान आधारभुत किमतीच्या कक्षेत आणावे तसेच कृषी मुल्य आयोगासारख्या सुनिश्चित यंत्रणेच्या माध्यमातून योग्य दर निश्चित करणे आवष्यक आहे अशी मागणी करतानाच ही यंत्रणा दुध उत्पादकांची आर्थिक लुट रोखण्यासाठी उपयोगी पडू शकेल असा विश्वास खा. लंके यांनी व्यक्त केला.

**पशुखाद्याचे दर आणि गुणवत्ता काळजीचा मुद्दा**

पशुखाद्याच्या किमती हा मोठा काळजीचा मुद्दा असल्याचे खा. लंके यांनी संसदेत निदर्शनास आणून दिले. दुध उत्पादनातून शेतकऱ्यांना मिळणारे उत्पन्न आणि पशुखाद्याच्या किमती याचा ताळमेळ बसत नाही.व्हेट ब्रानच्या एका पोत्याची किंमत सन २०२१-२२ मध्ये ८०० रुपए इतकी होती. आज त्याची किंमत जवळपास दुप्पट झाली आहे. ज्या प्रमाणात पशुखाद्याचे दर वाढले त्या प्रमाणात दुधाचे दर वाढले नसल्याने शेतकऱ्यांना दुग्ध व्यवसाय परवडत नसल्याचे नमुद करतानाच बाजारात उपलब्ध असलेल्या पशुखाद्याच्या गुणवत्तेबाबतही तक्रारी आहेत. निकृष्ठ दर्जाच्या खाद्यामुळे जनावरांच्या आरोग्यावर परिणाम होतो. त्यातून दुधाचे उत्पन्न आणि एकूणच उत्पादकता प्रभावित होते असेही खा. लंके यांनी सांगितले.

**प्रत्येक तालुक्यात गोशाळा सुरू कराव्यात :** आपण गायीला माता म्हणत असू तर तिला लागणारं अन्न देखील आपण उपलब्ध करून देत नसू तर त्यासारखे घोर पाप नसल्याचे खा. लंके आपल्या भाषणात म्हणाले. पशुखाद्याचे दर सातत्याने वाढत आहेत. अनेक शेतकऱ्यांना हे दर परवडणारे नाहीत. त्यामुळे जनावरांचा सांभाळ करण्याचा प्रश्न निर्माण झाला आहे. या परिस्थितीत सरकारने भाकड जनावरे, वृध्द गायी तसेच बैल यांच्या देखभालीसाठी प्रत्येक तालुक्यात गोशाळा स्थापन कराव्यात. त्यामुळे सरकारने केलेल्या कायद्यांचे पालन होईल आणि खऱ्या अर्थाने गोमाता व गोवंश संवर्धनाचे प्रयत्न यशस्वी होतील असेही खा. लंके आपल्या भाषणात म्हणाले.




हे दैनिक मालक-प्रकाशक, मुद्रक, संपादकः श्री पांडूरंग हरिदास सुरवसे यांनी संस्कृती प्रिंटींग प्रेस, एफ-3, वृंदावन पार्क, होटगी रोड, सोलापूर - 413003 येथे छापून येथूनच प्रसिद्ध केले. कार्यालयः एफ - 3, वृंदावन पार्क, होटगी रोड, सोलापूर - 413003
फोन/फॅक्स (0217)2605091 RNI No . MAHMAR 2006/17624 संपादकः पांडूरंग हरिदास सुरवसे, मो. (9765390339) उपसंपादकः सचिन मोहन जाधव, मो. (9657069069) कायदा सल्लागारः ॲड खतीब वकील.
Owner, Publisher, Printer and Editor Pandurang Haridas Survase Printing at Sanskruti Printing Press F-3 Vrundavan Park, Hotagi Road, Solapur 413003. (Maharashtra) Published from Office F-3 Vrundavan Park, Hotagi Road, Solapur 413003.(Maharashtra) Phone-0217-2605091 Editor Pandurang Survase-9765390339, Deputy Editor Sachin Jadhav-9657069069. **RNI No. MAHMAR 2006/17624**

# टेंभू उपसासिंचन योजनेचे अधिकारी यांच्या समवेत आढावा बैठक संपन्न

## खा. मोहिते पाटील यांनी रखडलेले कामे पूर्ण करण्याच्या सूचना दिल्या



**अकलूज (कटूसत्य वृत्त):–** आज सिंचन भवन पुणे येथे टेंभू उपसासिंचन योजनांच्या अनुषंगाने माढा लोकसभा मतदारसंघाचे खासदार धैर्यशील मोहिते–पाटील यांनी महाराष्ट्र कृष्णा खोरे विकास महामंडळाचे कार्यकारी संचालक कपोले व टेंभू उपसासिंचन योजनेचे अधिकारी यांच्या समवेत आढावा बैठक संपन्न झाली.

यावेळेस खासदार धैर्यशिल मोहिते–पाटील यांनी टेंभू विस्तारीत उपसा सिंचन योजनेचा आढावा घेऊन माण खटाव, सांगोला तालुक्यातील लाभक्षेत्राला लवकरात लवकर लाभ मिळवा यासाठी रखडलेले कामे पूर्ण करण्याच्या सुचना दिल्या..

तसेच कृष्णा नदीचे पुराचे पाणी तात्काळ उचलण्यात येऊन सांगोला तालुक्यातील माण नदीला पाणी सोडावे, त्याचबरोबर 0 ते 50 ' पर्यंत सांगोला कालव्यात पाणी सोडण्याच्या सुचना खासदार धैर्यशील मोहिते–पाटील यांनी केली.

निवडणुका डोळयासमोर ठेऊन काही इतर लोक दबावाचे राजकारण करतील त्या बळी पडून मनमानी पद्धतीने पाणी सोडू नये तसेच पाणी बंद करून नये. शेतकऱ्यांचा विचार करून पाणी वाटपाचे वर्षिक नियोजन करावे अशी देखील सुचना खासदार धैर्यशील मोहिते–पाटील यांनी केली.

या बैठकीस जेष्ठ नेते प्रभाकर देशमुख, सांगोला तालुक्याचे नेते डॉ.बाबासाहेब देशमुख, अनिल देसाई, अभयसिंह जगताप, रणजितसिंह देशमुख, अर्जुनसिंह मोहिते–पाटील, झपकेसर, अनिकेत देशमुख, सुरेंद्र गुदगे, कविताताई म्हेत्रे, मनोज पोळ, सुभाष नरळे, मुख्य अभियंता गुणाले, कार्यकारी अभियंता राजन रेडीय्यार, रासनकर, हरगुडे व लाभक्षेत्रातील प्रमुख नेतेमंडळी, नागरिक उपस्थित होते.

# शिवसेनेचे नगरसेवक अरविंद खरात यांनी केला स्वखर्चातुन रस्ता, नागरिकांनी मानले आभार



**माढा (कटूसत्य वृत्त):–** माढा नगरपंचायतचे शिवसेनेचे नगरसेवक अरविंद खरात यांनी स्वखर्चार्तुन रस्ता करुन सामाजिक बांधिलकी दाखवुन दिली आहे.

माढा शहरातील बोधले वस्ती ला जोडणारा रस्ता मागील अनेक वर्षापासुन प्रलंबित होता. रस्ताच नसल्याने सध्या पावसामुळे शेतकरी, नागरीक, शाळकरी विद्यार्थ्यार्ची मोठी गैरसोय होत होती.

ही गैरसोय ध्यानी घेऊन नुकतीच माढा नगरंपचायत मध्ये शिवसेनेचे नगरसेवक म्हणुन निवड झालेल्या अरविंद खरात यांनी प्रशासनाची वाट न पाहता एक लाखाच्या स्वखचार्तुन मुरुमीकरण करीत रस्ता तयार करुन दिला आहे. रस्ता करुन दिल्या बद्दल बोधले वस्ती भागातील नागरिकांनी अरविंद खरात यांचा सन्मान केला. नगरसेवक खरात यांनी आपल्या कामाची सुरुवात स्वखर्चातुन रस्ता तयार करुन केली आहे. यावेळी शंभु चवरे, पृथ्वीराज खेडकर, महेश खरात, स्वप्नील खरात, प्रसाद कुर्डे, बबलू माने, बाबा गोटे, नवनाथ गोटे, श्रीकांत गिरी, विपुल कदम, शुभम चव्हाण, दत्ता राऊत, नागेश बोधले यांचेसह नागरीक उपस्थित होते.

# अकलूज आगारा मार्फत मागणी प्रमाणे देवदर्शनासाठी बस मिळणार

## श्रावण सोमवार निमित्त देवदर्शन घेऊया लाल परीसंगे



**अकलूज (कटूसत्य वृत्त):–** तब्बल ७१ वषानंतर श्रावण महिना सोमवार पासून सुरु होत असून, श्रावण मासाची सांगता देखील सोमवारीच होत आहे. या आलेल्या दुर्मिळ योगाच्या अनुषंगाने अकलूज आगरामार्फत पूर्ण महिनाभर (ऑगस्ट) देवदर्शनासाठी मागणीप्रमाणे बस देण्यात येणार आहे. श्रावण महिन्यात भक्तगणांना देवदर्शनाचा लाभ महामंडळाच्या लाल परीने घेता यावा यासाठी नियोजन करण्यात आले आहे. शिखर शिंगणापूर, अष्टविनायक गणपती दर्शनासह इतर ठिकाणच्या देवदर्शनाचा लाभ भक्तगणाना घेता येणार आहे.

श्रावण महिन्यात भक्तगणांना देवदर्शनाचा लाभ घेता यावा यासाठी विविध ठिकाणी मागणीप्रमाणे स्वतंत्र बस धावणार आहेत. अकलूज आगारातून देवदर्शनासाठी विविध ठिकाणी धावणाऱ्या बसेस व तिकीट दर (अंदाजे) पुढीलप्रमाणे १) अष्टविनायक दर्शन बस फूल तिकीट १८००/– हाफ तिकिट ९००/– २) शनिशिंगणापूर व जवळपासचे देवदर्शन बस फूल तिकीट १३०५/– हाफ तिकिट ६५५/– ३) त्र्यंबकेश्वर व इतर देवदर्शन बस फूल तिकीट १७४०/– हाफ तिकिट ८७०/– ४) भीमाशंकर दर्शन बस फुल तिकीट ९००/– हाफ तिकीट ४५०/– ५) गणपतीपुळे दर्शन बस फुल तिकीट १३०५/– हाफ तिकिट ६५५/– ६) साडेतीन शक्तीपीठ दर्शन बस फूल तिकीट २७००/– हाफ तिकिट १३५०/– ७) शेगाव गजानन महाराज दर्शन बस फूल तिकीट १७४०/– हाफ तिकिट ८७०/– ८) गाणगापुर दर्शन बस फुल तिकीट ७८०/– हाफ तिकिट ३९०/– ९) गोंदवले औदुंबर कोल्हापूर दर्शन बस फूल तिकीट ८७०/– हाफ तिकिट ४३५/– १०) लोणार शेगाव आनंदसागर दर्शन बस फुल तिकीट १३५०/– हाफ तिकिट ६७५/– . अशाप्रकारे आगरामार्फत देवदर्शनासाठी मार्ग निश्चित करण्यात आलेले असून भाविकांच्या मागणीप्रमाणे बदल हवा असल्यास करुन देण्यात येईल. बुकिंग करीता व दर्शन बस च्या नियम व अटींसाठी प्रत्यक्ष आगारात येऊन खालील यात्रा प्रमुख याना भेटण्याचे अथवा संपर्क करण्याचे आवाहन आगार व्यवस्थापक यांनी केले आहे.

यात्रा प्रमुख १) सोनवलकर ९८८१३९३४७८. २) रंदवे ९६३७०८०००६. ८७६६९१४२९२ ३) पिसे ९७६३५६५७६०. ४) लंगोटे ९९२३०८१५५९.

या दरामध्ये केवळ प्रवास खर्च समाविष्ट आहेत. तसेच या प्रवासाकरीता रा. प. नियमाप्रमाणे सर्व सवलती लागू आहेत. ग्रुप बुकिंग व महिला बचत गट यासाठी थेट गावातून बस उपलब्ध होईल त्यासाठी नियम व अटी लागू राहणार आहेत. सदर दर्शन बस साठी किमान ४२ प्रवाश्यांचा ग्रुप असणे आवश्यक असून ग्रुप तयार असल्यास ग्रुप च्या मागणी नुसार तारीख देण्यात येईल.

### मागील वर्षीप्रमाणे या वर्षीही नियोजन

मागील वर्षी श्रावण महिन्यात अशाच देवदर्शन बस सेवा सुरु करण्यात आली होती. त्यास अकलूज पंचक्रोशीतील भाविकानी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला होता. त्या नुसार याही वर्षी असेच नियोजन केले असून या किफायतशीर व सुरक्षित प्रवासाची हमी देणाऱ्या दर्शन बस सेवेचा लाभ भक्तगणांनी घ्यावा असे आवाहन करण्यात येत आहे.

**– प्रमोद र. शिंदे,** आगार व्यवस्थापक, अकलूज

# चेअरमन अभिजीत पाटील यांच्या वाढदिवसानिमित्त नागनाथ मुक बधीर निवासी विद्यालयातील विद्यार्थ्यांना स्नेह भोजन व वृक्षारोपण कार्यक्रम संपन्न



**पंढरपूर, (कटूसत्य वृत्त):–** श्री विठ्ठल सह. साखर कारखान्याचे चेअरमन अभिजीतआबा पाटील यांच्या ४१ व्या वाढदिवसाचे औचित्य साधुन कारखाना येथे रक्तदान शिबीर, वृक्षारोपण, शालेय मुलांना खाऊ, गणवेश व शालेय साहित्य वाटप असे विविध समाजपयोगी कार्यक्रम राबवुन साजरा करणेत येत आहे. त्यामध्ये आज दिनांक ०५.०८.२०२४ रोजी श्री नागनाथ मुक बधीर निवासी विद्यालय, बाभुळगांव येथील विदयार्थ्यांना स्नेह भोजन देण्यात आले. सदर कार्यक्रम कारखान्याचे संचालक अंगद चिखलकर, प्रविण कोळेकर, सिध्देश्वर बंडगर यांचे प्रमुख उपस्थित संपन्न झाला. तसेच सदर मान्यवरांच्या शुभहस्ते विद्यालयाचे प्रांगणामध्ये विविध फळांचे झाडांचे वृक्षारोपण करणेत आले.

सदर कार्यक्रमाप्रसंगी प्रास्ताविक व स्वागत पर भाषणामध्ये बोलताना मुकबधीर शाळेचे शिक्षक राजेंद्र बाबर म्हणाले की, आपण मागील वषापासुन कारखान्याचे चेअरमन अभिजीतआबा पाटील यांच्या वाढदिवसाचे औचित्य साधुन येथील विदयार्थ्यांना स्नेहभोजन देण्याचा उपक्रम राबवित आहात. त्याबद्दल सर्वाचे आभार व्यक्त केले. या निष्पाप बालकांकडुन आबांना वाढदिवसानिमित्त लाख लाख शुभेच्छा व्यक्त केल्या.

यापसंगी कारखान्याचे संचालक अंगद उध्दव चिखलकर म्हणाले की, अभिजीत आबा पाटील त्यांच्या रुपाने आपल्याला धडाडीचे नेतृत्व लाभले आहे. वाढदिवसानिमित्त कारखान्याचे अधिकारी व कर्मचारी यांनी या अनाथ मुलांसाठी स्नेह भोजन देवून हा स्तुत्य उपक्रम राबविलेला आहे. आबांच्या हातुन असेच गोरगरीब जनतेसाठी समाजपयोगी कार्य घडावे व त्यांची वरचेवर प्रगती व्हावी अशा भावना व्यक्त करुन वाढदिवसानिमित्त अभिजीतआबा पाटील यांना शुभेच्छा दिल्या.

यापसंगी तेजस इंग्लिश मिडीयम बाभुळगांवचे संस्थापक महेश कथले म्हणाले की, कारखान्याचे चेअरमन अभिजीतआबा पाटील यांच्या ४१ व्या वाढदिवसाचे औचित्य साधुन विविध समाजपयोगी कार्यक्रम राबविले बद्दल धन्यवाद दिले. अभिजीतआबा पाटील यांचे रुपाने आपल्या जिल्ह्याला तरुण व तडफदार असे नेतृत्व लाभलेले आहेत अशा भावना व्यक्त करुन शेवटी त्यांनी वाढदिवसानिमित्त अभिजीतआबा पाटील यांना शुभेच्छा दिल्या.

सदर कार्यक्रमास शिवप्रेमी दुध संकलन या संस्थेचे चेअरमन गणेश गांडुळे, कारखान्याचे सेल्स ऑफिसर महेश घाडगे, कार्यालयीन अधिक्षक आबासाहेब कथले, संगणक विभाग प्रमुख सुधीर गुंड, असि. ऊस विकास अधिकारी बागल, सुरक्षा अधिकारी माळी, शेती विभागातील सर्व फिल्ड स्टाफ व इतर मान्यवर, मुकबधीर विदयालयाचे सर्व स्टाफ व कारखान्याचे सर्व अधिकारी, कर्मचारी वर्ग, कार्यकर्ते, सभासद व हितचिंतक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# सोलापूरातील 'शायरांची मैफल' कार्यक्रमाचे आयोजन

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):–** सोलापूररातील साहित्य क्षेत्रात ज्यांनी भरीव कामगिरी केली अशा नामांकित साहित्यकांचा सन्मान व्हावा तसेच नवोदित शायराना हक्काचे व्यासपीठ उपलब्ध व्हावे या उद्देशाने सोलापूरातील शायरांची मैफल या अनोख्या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले असल्याची माहिती ऊर्दु घर सांस्कृतिक समितीचे उपाध्यक्ष तथा उपविभागीय अधिकारी सदाशिव पडदुणे यांनी दिली.

ही मैफिल शनिवार दि.10 ऑगस्ट 2024 रोजी संध्याकाळी 7.30 वाजता ऊर्दु घर सोलापूर (छत्रपती शिवाजी महाराज सर्वोपचार रुग्णालय समोर) होत आहे. या मुशायरामध्ये सोलापूर तसेच सोलापुरातील जेष्ठ शायरांचा व नवोदित कवींचा सहभाग असणार आहे.

या मैलिलीच्या अध्यक्षस्थानी अब्दुल रशीद अरशद व निवेदक आसिफ इकबाल असणार आहेत. सोलापूरातील शायर मिर अफजल मिर, बशीर अहमद बशीर, वहाब जमील, हबीब अहमद शौक, अजीजुल वहाब, शफी सत्तारी, जाकीर तनवीर, आरजू राजस्थानी, नासिर अशरफी, रफी नवाज, अब्दुल शुकुर शौर, इक्बाल दुर्वेश, बाकर हाफिज साहब, तालिब सोलापुरी, अश्फाक जैद, नजमुद्दीन अंजूम, इरफान करीगर, शादा पितापुरी, सरफराज बंदेनवजी, वजाहत अब्दुल सत्तार, इत्यादींचा समावेश राहणार आहे. तरी ऊर्दु प्रमी रसिकांनी या अनोख्या मुशायराचा मैफिलीत उपस्थित राहून आनंद घ्यावा असे आवाहनही ऊर्दु घर सांस्कृतिक समितीचे उपाध्यक्ष तथा उपविभागीय अधिकारी सदाशिव पडदुणे यांनी केले आहे.

# उपमुख्यमंत्री अजितदादा चषक चे मानकरी GK बिल्डर तर उपविजेता गणेश जिम संघ

## राष्ट्रवादी युवक संघटना आयोजित अजित दादा चषक भव्य टेनिस बॉल क्रिकेट स्पर्धेस उदंड प्रतिसाद



**सोलापूर (कटूसत्य वृत्त):–** राष्ट्रीय अध्यक्ष राज्याचे उपमुख्यमंत्री अजितदादा पवार व प्रदेशाध्यक्ष खासदार सुनीलजी तटकरे साहेब यांच्या वाढदिवसानिमित्त राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी युवक संघटनेच्या वतीने भव्य अजितदादा चषक टेनिस क्रिकेट स्पधेर्चे आयोजन करण्यात आले होते.

या कार्यक्रमास व्यासपीठावर जिल्हाध्यक्ष संतोष भाऊ पवार, माजी गटनेते, सोलापूर महानगरपालिकेचे माजी नगरसेवक ऊढ.ऊउ सदस्य किसन भाऊ जाधव, ज्येष्ठ नेते हेमंत चौधरी, जनरल सेक्रेटरी प्रमोद भोसले, माजी परिवहन सभापती आनंद, माजी नगरसेवक नारायण माशाळकर, मुस्तारे, सेवादल अध्यक्ष प्रकाश जाधव, युवक अध्यक्ष सुहास कदम, कार्याध्यक्ष तुषार जक्का,कार्यालयीन प्रमुख महेश कुलकर्णी, सामाजिक न्याय विभाग अध्यक्ष राजाभाऊ बेळेनवरु, कार्याध्यक्ष अनिल बनसोडे, V.J.N T सेल अध्यक्ष रुपेशकुमार भोसले, कामगार आघाडी अध्यक्ष मार्तंड शिंगारे, कार्याध्यक्ष संजय सांगळे, वैद्यकीय मदत कक्ष प्रमुख बसवराज कोळी, राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी युवक प्रदेश सचिव विशाल बंगाळे, शहर संघटक संदीप पाटेकर, दिव्यांग असेल कार्याध्यक्ष M.M. ईटकळे, शहर उत्तर संघटक प्रकाश झाडबुके, शहर उपाध्यक्ष शामराव गांगर्डे सोशल मीडिया शहर जिल्हाध्यक्ष वैभव गंगणे यांची उपस्थिती होती अजितदादा चषकचे आयोजन दत्तात्रय बडगंची यांनी केले होते सर्वच मान्यवरांचा सत्कार सोहळा आनंदी वातावरणात पार पडला.

या स्पर्धेत G.K बिल्डर संघ विरुद्ध गणेश जिम संघ यांच्यात रोमांचक अंतिम सामना रंगला यामध्ये गणेश जिम संघाने प्रथम ७ ओव्हर मध्ये ७४ रन केले.यानंतर दुसऱ्या इनिंग मध्ये G.K बिल्डर संघाने विजयासाठी असणारे रणांचे टार्गेट पूर्ण करून गणेश जिम संघावर मात करत ७ ओव्हर मध्ये विजयाचा झेंडा लावला.

यानंतर प्रथम विजेत्या G K बिल्डर संघास जिल्हाध्यक्ष संतोष पवार प्रदेश उपाध्यक्ष किसन जाधव आणि मान्यवरांच्या हस्ते यंदाचे मानाचे अजित दादा चषक व उपविजेत्या संघास ही ट्रॉफी देऊन गौरवण्यात आले.या स्पर्धेत एकूण वेगवेगळ्या २२ संघांनी सहभाग घेतला होता.

यावेळी 'एकच वादा अजित दादा', 'विकासाचा वादा अजित दादा,' 'राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचा विजय असो', अश्या घोषणांनी जवाहर मैदान दणाणून सोडले.

यावेळी व्यासपीठावरील उपस्थित मान्यवरांनी अजित दादांच्या वाढदिवसानिमित्त युवक संघटनेच्या वतीने आयोजित स्पर्धेचे विशेष कौतुक केले.

यानंतर अजित दादा चषकाचे यंदाचे मानकरी असणाऱ्या G.k बिल्डर संघा च्या खेळाडूंनी एकच जल्लोष केला. यावेळी उपस्थित क्रिकेट प्रेमिंमध्ये आनंदाचे वातावरण पाहायला मिळाले.

# प्रबळ इच्छाशक्ती असेल तर अशक्य असं काहीही नाही – केंद्रप्रमुख दिगंबर काळे



**माढा (कटूसत्य वृत्त):–** कितीही अडचणी आल्या समस्या निर्माण झाल्या तरी हतबल न होता समस्या निराकरणावरती लक्ष केंद्रित करावं यामुळे समस्या तर सुटेलच पण एक वेगळा आनंद ही प्राप्त होईल परिणाम कारक गुणवत्तेच्या समस्येवरती व शाळेची प्रतवारी वाढवण्यासाठी निपुण भारत अध्ययन निष्पत्ती हा भाग खूपच महत्वाचा आहे पॅट चाचणी घेतली आहे आता अध्ययन निष्पत्ती नुसार प्रत्येक मुलांचा अध्ययन स्तर निश्चित करून गुणवत्तेत मागे असणाऱ्या मुलांसाठी कृती आराखडा तयार करून प्रगत करावे मुलांसाठी वेळ द्या मुलाना स्वतःची मत मांडण्यास संधी द्या परिणामकारक संवाद साधला जावा प्रत्येक मुलं शिकू शकत ही भावना स्वतःमध्ये निर्माण करा विलक्षण इच्छाशक्ती समोर नियती गुडघे टेकते प्रबळ इच्छाशक्ती असेल तर अशक्य असं काहीही नाही असे मत केंद्रप्रमुख दिगंबर काळे यांनी उपळाई व माढा केंद्राच्या शिक्षण शिक्षण परिषदेत शिक्षकांना संबोधित करताना बोलत होते.

श्रीकांत काशीद यांनी स्वास्थ्य पत्रिका शाम चव्हाण यांनी निपुण भारत प्रशांत ओहळ गणित पॅट चाचणी शिवाजी कदम यांनी अभ्यासपूर्ण असे मार्गदर्शन केले चर्चेत सकिना आतर शुभांगी गवळी अनिल काळे यांनी सहभाग घेतला शिक्षण परिषदेची सुरवात माय सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमा पूजनाने झाली सवेंद्र लंकेश्वर यांनी परिपाठ घेतला प्रास्तविक केंद्रप्रमुख सुरेश माळी यांनी केले आभार विजय काळे यांनी मानले विषयाला अनुसरून सुत्रसंचालन वैजीनाथ मोगल यांनी केले.

# लाभक्षेत्रात विद्युत मोटारी काढण्याची लगबग

## उजनी शंभर टक्के भरल्याने शेतकऱ्यांच्या चेहऱ्यावर आनंद



**वाशिंबे (सचिन भोईटे):–** सोलापूर, पुणे सह नगर जिल्ह्याची वरदान असलेल्या उजनी जलाशयाच्या पाण्यासाठ्यात पुणे जिल्ह्यात धरण क्षेत्रात होत असलेल्या जोरदार पावसामुळे मोठ्या प्रमाणात वाढ झालेली आहे.भीमा नदीत दौंण्ड येथे मोठ्या प्रमाणात पाण्याचा विसर्ग होत आहे.त्यामुळे नदीच्या पाणी पातळीत मोठ्या वाढ झाली आहे.त्यामुळे लाभ क्षेत्रातील शेतकऱ्यांमधून आनंद व्यक्त होत आहे. नदीच्या पोटात ठेवलेल्या विद्युत मोटारी काढण्याची लगबग शेतकऱ्यांची सुरू आहे.

उन्हाळ्यात धरण साठा मायनस ६०% टक्के पर्यंत खाली गेला होता. त्यामुळे विद्युत पंप, पाईप ,केबल व इतर उपकरणाच्या पोटापर्यंत शेतकऱ्यांनी नेऊन जोडली होती. धरण क्षेत्रात होणाऱ्या पावसामुळे नदीच्या पाणी पातळीत प्रचंड वेग असल्याने उजनी लाभ क्षेत्रातील वाशिंबे (ता. करमाळा) येथील शेतकऱ्यांमध्ये विद्युत पंप, पाईप, केबल, मोटर स्टार्टर काढण्यासाठी धांदल उडालेली आहे.

पुणे जिल्हा परिसर व धरण क्षेत्रात होत असलेल्या पावसामुळे नद्यां,नाले, वडे भरून वाहत आहेत हे सर्व पाणी उजनी जलाशयात दाखल होत असल्याने धरणाचा पाण्यासाठी झपाट्याने वाढ होऊन धरण १००% भरले असून, धरणातून मोठ्या प्रमाणात भिमा नदीत पाण्याचा विसर्ग केला जात आहे. पुणे जिल्हा तसेच धरण क्षेत्रात सर्वत्र जोरदार पाऊस बरसात होत असल्याने पुणे जिल्ह्यातील मुळा– मुठा, पवना तसेच इंद्रायणी नद्या हाऊसफुल्ल होऊन वाहत आहेत. लाभक्षेत्रातील जलाशयाच्या फुगवटा भागातील नदी काठावरील करमाळा, इंदापूर, कर्जत तालुक्यातील शेतकरी आपल्या विद्युत मोटारी व साहित्य पाण्यापासून दूर करण्यात मग्न आहे. धरण यावर्षी १००% भरल्याचा आनंद शेतकरी वर्गात पाहवयास मिळत आहे.

# मार्कंडेय मंदिराच्या स्थापनेस 100 वर्षे पूर्ण

## शताब्दी वर्षा निमित्ताने विविध धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन



**सोलापूर (कटूसत्य वृत्त):–** पदमशाली ज्ञाती संस्थेचे अध्यक्ष सुरेश फलमारी यांनी पत्रकार परिषदेत हि माहिती दिली, पदमशाली समाजाचे कुलदैवत श्री मार्कंर्डेय मंदिराच्या स्थापणेस 100 वर्षे पूर्ण होत असून मंदिराच्या शताब्दी महोत्सव निमित्त शुक्रवार दिनांक 9 ऑगस्ट ते 12 ऑगस्ट या कालावधीत मंदिरात श्री मार्कंर्डेय महामुनीचे पुर्नप्रतिष्ठापना कार्यक्रम आयोजित केले असून दिनांक 11 ऑगस्ट रोजी श्री मार्कंर्डेय महामुनींचे प्रतिष्ठापना विधी आणि 12 ऑगस्ट रोजी श्री. मार्कंर्डेय महानुनीच्या मुळमुर्तीस "शतघटाभिषेकह्व कार्यक्रम व महाप्रसाद

कार्यक्रम आयोजित करण्यात आले आहे. व तसेच यंदाच्या शतक महोत्सव निमित्त स्मरणीका काढण्यात येत असून त्याचे संपुर्ण काम श्री. प्रविण पोटाबत्ती हे पहात आहे. यंदाच्या वर्षी शतक महोत्सव निमित्त समाजासाठी ज्यानी योगदान दिली आहे असे सर्वश्री गंगाधर कुचन,

कै. इरप्पा बोल्ली, कै. विष्णुपंत कोठे, आडम मास्टर यांना जीवनगौरव पुरस्कार देऊन गौरविण्यात येणार आहे व तसेच समाजाचे तरुण उद्योजकांचा शतक महोत्सवात सत्कार करण्यात येणार आहे असं सुरेश फलमारी यांनी सांगितले.

या पत्रकार परिषदेस माजी महापौर जनार्दन कारमपुरी,रामचंद्र जन्नू,नरसप्पा इप्पाकायल,मुलीधर आरकाल,संतोष सोमा,महांकाळ येलदी,रमेश कैरमकोंडा,राकेश पुंजाल, शेखर कटकम, नागेश बंडी यांची उपस्थिती होती.

# शिवस्मारकतर्फे देशभक्तीगीत समूहगान स्पर्धेचे आयोजन

## शाळांनी मोठ्या संख्येने सहभागी होण्याचे आवाहन

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):–** श्री छत्रपती शिवाजी महाराज स्मारक मंडळातर्फे (शिवस्मारक) सोमवार दिनांक १२ ऑगस्ट रोजी देशभक्तीगीत समूहगान स्पधेर्चे आयोजन करण्यात आल्याची माहिती शिवस्मारकचे अध्यक्ष रंगनाथ बंकापूर यांनी सोमवारी पत्रकार परिषदेत दिली.

सोमवार दिनांक १२ ऑगस्ट रोजी नवी पेठ येथील शिवस्मारक सभागृहात सकाळी १० वाजता स्पर्धेस प्रारंभ होणार आहे. या स्पधेर्साठी प्रवेश निःशुल्क आहे. शालेय स्तरावरील ही स्पर्धा इयत्ता पहिली ते चौथी, पाचवी ते सातवी आणि आठवी ते दहावी अशा तीन गटांमध्ये होणार आहे. या स्पधेर्तील विजेत्यांना प्रथम पारितोषिक पाच हजार रुपये आणि सन्मानचिन्हे, द्वितीय पारितोषिक तीन हजार रुपये आणि सन्मानचिन्हे तर तृतीय पारितोषिक दोन हजार रुपये, सन्मानचिन्हे देण्यात येणार आहे. तर सर्व सहभागी स्पर्धकांना सहभाग प्रमाणपत्र आणि जगद्गुरु संत श्री तुकाराम महाराजांचे वंशज ह.भ.प. शिरिष महाराज मोरे लिखित 'छत्रपती शिवाजी महाराज समजून घेताना' हे पुस्तक देण्यात येणार आहे. प्रत्येक गटासाठी स्वतंत्र पारितोषिक दिले जाणार आहे.

या स्पधेर्साठी नाव नोंदणी शनिवार दिनांक १० ऑगस्टपर्यंत दररोज सकाळी ११ ते सायंकाळी पाच वाजेपर्यंत नवी पेठ येथील शिवस्मारक कार्यालयात करता येईल. नोंदणीसाठी शिवस्मारकचे व्यवस्थापक मल्लिनाथ होटकर यांच्याशी ९८२२४९८३७३ या भ्रमणध्वनी क्रमांकावर संपर्क साधावा. सोलापूर शहर आणि जिल्ह्यातील अधिकाधिक शाळांनी या देशभक्तीगीत समूहगान स्पर्धेत सहभागी व्हावे, असे आवाहन शिवस्मारकतर्फे करण्यात आले आहे.

या पत्रकार परिषदेस शिवस्मारकचे अध्यक्ष रंगनाथ बंकापूर, सचिव गंगाधर गवसने, कोषाध्यक्ष धनंजय कुलकर्णी, संचालिका आणि स्पर्धा प्रमुख माधवी कुलकर्णी, संचालक प्रा. देवानंद चिलवंत, प्रसाद जीरांकलगीकर, व्यवस्थापक मल्लिनाथ होटकर उपस्थित होते.

### शिवस्मारकतर्फे वर्षभर चालतात विविध उपक्रम

शिवस्मारकतर्फे वर्षभर व्याख्यानमाला, किल्ले बांधणी स्पर्धा, आरोग्य शिबीर, वक्तृत्व स्पर्धा, भजन स्पर्धा, सूर्यनमस्कार स्पर्धा व्यायाम शाळा, शिवशिल्पप्रदर्शन आदी उपक्रम आयोजित करण्यात येतात. या उपक्रमांमध्ये शेकडो जण सहभागी होतात. यंदाच्या वर्षभरातही असे उपक्रम होणार असल्याचे शिवस्मारकचे अध्यक्ष रंगनाथ बंकापूर यांनी सांगितले.